# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत टेकडी रोड सिताबर्डी
**{ प्रकल्प विभाग }** येथील संरक्षण विभागाच्या खुल्या जागेवर ऐतिहासिक हुतात्मा स्मारक उद्यान तयार करण्याच्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्थापत्य विषयक कामाकरीता रू.7,99,47,099/-, उद्यान विभागामार्फत उद्यान विषयक कामाकरीता रू.16,00,685/- व विद्युत विभागामार्फत विद्युत विषयक कामाकरीता रू. 49,80,553/- तांत्रिक मान्यता प्रदान असून सदर रक्कमेवरील शुल्क रू. 20,11,998/- मिळून एकूण रु. 8,85,40,335/- राशीच्या प्राकलणास पद क्र.A42001374601 (773) अंतर्गत मा.आयुक्त महोदय यांनी दि.06/08/2025 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे.

करीता उक्त कामाकरीता रु.8,85,40,335/- रक्कमेला प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे तसेच सदर कामाकरीता निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :-

1) प्रस्तृत कामाकरीता पद क्र. A42001374601 (773) अंतर्गत प्रावधान देण्यात आलेले आहे.
2) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 230/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 12/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-3), प्रकल्प विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत टेकडी रोड सिताबर्डी येथील संरक्षण विभागाच्या खुल्या जागेवर ऐतिहासिक हुतात्मा स्मारक उद्यान तयार करण्याच्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्थापत्य विषयक कामाकरीता रू.7,99,47,099/-, उद्यान विभागामार्फत उद्यान विषयक कामाकरीता रू.16,00,685/- व विद्युत विभागामार्फत विद्युत विषयक कामाकरीता रू. 49,80,553/- तांत्रिक मान्यता प्रदान असून सदर रक्कमेवरील शुल्क रू.20,11,998/- मिळून एकूण रु. 8,85,40,335/- राशीच्या प्राकलणास पद क्र.A42001374601 (773) अंतर्गत मा.आयुक्त महोदय यांनी दि.06/08/2025 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे.

करीता उक्त कामाकरीता रु. 8,85,40,335/- रक्कमेला प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे तसेच सदर कामाकरीता निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.